# प्रकरण चौथे
# संशोधन कार्यपद्धती

# प्रकरण चौथे

## संशोधन कार्यपद्धती .

४ .०१ प्रास्ताविक .

४ .०२ पूर्वतयारी .

४ .०३ संशोधन पद्धती .

४ .०४ नमुना निवड .

४ .०५ संशोधनाची साधने .

४ .०६ मुख्याध्यापकांसाठी प्रश्नावली .

४ .०७ केंद्रप्रमुखांच्या मुलाखतीसाठी प्रश्नसूची .

४ .०८ शिक्षणविस्तार अधिका-यांसाठी प्रश्नसूची .

४ .०९ गटशिक्षणाधिका-यांसाठी प्रश्नसूची .

४ .१० प्राथमिक शाळांना भेटी व निरीक्षणे .

४ .११ संशोधनाची कार्यपद्धती .

४ .१२ समारोप .

# प्रकरण चौथे

## संशोधन कार्यपद्धती.

### ४.०१ प्रास्ताविक

संशोधकाने प्राथमिक शाळांच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास या विषयावर संशोधन करण्याचे निश्चित केल्यावर प्रस्तुत संशोधनासाठी माळशिरस तालुका निवडला. माळशिरस तालुक्याला नैसर्गिक पार्श्वभूमी व राजकीय तसेच ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली आहे. सह्याद्री पर्वताच्या उपरांगापैकी दिवे घाटाच्या उपरांगा या तालुक्याच्या सिमेपर्यंत आलेल्या आहेत. दिवे घाटाच्या उपरांगांच्या पायथ्याला माळशिरस तालुका आहे.

माळशिरस तालुक्याच्या उत्तर सिमेवरून नीरा नदी वाहते. ती पुढे जाऊन माढा तालुक्याच्या व माळशिरस तालुक्याच्या सिमेवर संगम येथे भिमा नदीला मिळते. पावसामुळे सतत दुष्काळग्रस्त असणारा माळशिरस तालुका मात्र वीर व भाटगर धरणामुळे उन्हाळयातही पिके घेण्यास पात्र ठरला आहे. कॅनॉलचे पाणी आणि राजकीय बळ यावर या तालुक्याने शेती क्षेत्रात भरपूर सुधारणा घडवून आणल्या आहेत. ऊस हे ह्या तालुक्यातील प्रमुख पिक आहे. उन्हाळी पाण्याची सोय आणि साखर कारखाने यामुळे लोकांचा आर्थिक विकास जोमाने झाला आहे. त्यामुळे सार्वजनिक राहणीमानाचा दर्जा उंचावला आहे. परंतू शैक्षणिक प्रगती मात्र पूर्व भाग वगळता इतरत्र झालेली दिसून येत नाही.

शिक्षण हा एक संस्कार आहे. या संस्कारातून व्यक्तिचा सर्वांगिण विकास होतो. सामाजिक आणि वैयक्तिक विकासासाठी शिक्षणाची संधी आवश्यक आहे. माळशिरस तालुक्यात सर्वांना समान शिक्षणाची संधी मिळत आहे.

माळशिरस तालुक्यातील शैक्षणिक कार्य सर्वांगिण विकासासाठी मोलाचे आहे. माळशिरस तालुका वाडया वस्त्यांचा तालुका म्हणून परिचीत आहे. या तालुक्याचे अजून एक वैशिष्टय म्हणजे अशिया खंडातील सर्वात मोठी ग्रामपंचायत या तालुक्यात आहे. एकही नगरपालिका शाळा ह्या तालुक्यात नाही. या तालुक्यात वाडयावस्त्यावर सुद्धा शाळा, बालवाडी, माध्यमिक शाळा पोहोचल्या आहेत.

या तालुक्यातील केंद्रस्थानी असलेल्या माळशिरस, नातेपुते, वेळापूर, धर्मपूरी, मोरोची, पिलिव, फोंडशिरस, बोरगाव, निमगांव, संगम, माळीनगर, अकलूज, दहिगाव, कळंबोली, शिंदेवाडी, मळोली, आनंदनगर या गावी केंद्रशाळा आहेत व माध्यमिक शाळाही आहेत. संशोधकाने माळशिरस तालुक्यातील प्राथमिक शाळा अभ्यासासाठी निवडलेल्या आहेत. संशोधक माळशिरस तालुक्यातील एकशिव गावी सर्व्हिससाठी असल्यामुळे तो भावनिक दृष्टया एकात्म झालेला आहे म्हणून संशोधकाने माळशिरस तालुका निवडलेला आहे. माळशिरस तालुक्यात प्राथमिक शाळा कोठे आहेत याचे सर्वप्रथम निरीक्षण केले.

माळशिरस तालुक्यातील ग्रामीण भागातील बहुतांश शाळा जिल्हा परिषदेकडून चालविल्या जातात. त्याच बरोबर कांही प्राथमिक शाळा खाजगी संस्थांमार्फत चालविल्या जातात. या तालुक्यातील एकही शाळा नगरपालिक नसल्याने त्यांच्या व्यवस्थापनात नाही.

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने या तालुक्यातील सर्वच म्हणजे ३०२ शाळांची संशोधनासाठी निवड केली. या प्राथमिक शाळेत पहिली ते चौथी, पहिली ते सातवी व पहिली ते दहावी असे वर्ग आहेत. अशा रितीने सर्वच बाबतीत विविधता असलेल्या प्राथमिक शाळांचा अभ्यास करण्याचे संशोधकाने ठरविले.

## ४.०२ पूर्वतयारी.

माळशिरस तालुक्यातील प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास हा विषय संशोधकाने संशोधनासाठी निवडल्यानंतर माळशिरस तालुक्यातील प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास करण्याचे निश्चित केले. अनुदानित प्राथमिक शाळांचे प्रशासन कसे चालते हे पाहणे आवश्यक आहे. येथे विना अनुदानित शाळांच्या प्रशासनाचा अभ्यास करण्यात आलेला नाही.

माळशिरस तालुक्यातील ९०% शाळा (प्राथमिक) स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत (जि.प.) चालविल्या जातात. त्यामुळे या शाळांची सुरूवात होताच या शाळांना अनुदान मिळते. २% शाळा महाराष्ट्र राज्य शेती महामंडळामार्फत चालविल्या जातात. त्यांनाही १००% अनुदान आहे आणि ८% शाळा खाजगी संस्थांमार्फत चालविल्या जातात. यातील

३% शाळा विना अनुदानित आहेत. या संशोधनात विना अनुदानित शाळांचा अभ्यास करण्यात आलेला नाही.

माळशिरस तालुक्यातील ३०२ शाळांपैकी संशोधकाने २५ शाळांना भेटी दिल्या. संशोधकाने तेथील शालेय परिसर, वातावरण, इमरत तसेच इतर भौतिक सुविधा पाहिल्या. मुख्याध्यापक, शिक्षक यांच्याशी चर्चा केली. प्राथमिक शाळेचा प्रमुख प्रशासक मुख्याध्यापक असल्याने त्यांची संशोधनासाठी निवड केली.

प्राथमिक शाळांच्या प्रशासनाची कार्यवाही मुख्याध्यापकांकडून केली जाते. म्हणून संशोधकाने मुख्याध्यापकांची निवड केली. १० ते १२ प्राथमिक शाळांसाठी एक केंद्रशाळा असते. या शाळांची शैक्षणिक प्रगती व्हावी यासाठी केंद्रप्रमुख मदत करीत असतो. केंद्रप्रमुखाकडे शैक्षणिक व प्रशासकीय कामे असतात म्हणून संशोधकाने केंद्रप्रमुखांची मदत संशोधन कार्यासाठी घेतली.

चाळीस ते पन्नास शाळांचे मिळून एक बीट बनते. या बीट मधील प्राथमिक शाळांच्या समस्या सोडविण्यासाठी शैक्षणिक व प्रशासकीय कामांवर नियंत्रण ठेवण्यासाठी एक शिक्षण विस्तार अधिकारी नेमलेला असतो. प्राथमिक शिक्षणातील महत्वाचा दुवा असलेल्या शिक्षण विस्तार अधिका-यांचेही सहकार्य संशोधन कार्यासाठी घेतले.

माळशिरस तालुक्यातील प्राथमिक शिक्षणाचा प्रमुख म्हणून गटशिक्षणाधिकारी काम पाहतो. त्यांचीही निवड संशोधन कामासाठी केली आहे. प्राथमिक शिक्षणाचे तालुक्यातील प्रशासन गटशिक्षणाधिका-यांमार्फत चालते व त्यांना शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख व मुख्याध्यापक या कामी मदत करीत असतात. संशोधकाने संशोधनासाठी सर्वांचा विचार करून निश्चित कार्यक्रम ठरविला. गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख या सर्वांना कार्याचा आराखडा प्रथम भेटीतच सांगीतला. मुख्याध्यापकांना प्राथमिक शिक्षणाबाबत प्रश्नावली देऊन भरून घेण्यात आली.

गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख व मुख्याध्यापक या सर्वांची संशोधन कार्यासाठी निवड करण्यात आली.

## ४.०३ संशोधन पद्धती.

शैक्षणिक संशोधन विविध पद्धतीने केले जाते. त्याचे पुढील तीन विभागात विभाजन केले जाते.

१) भूतकाळाशी संबंधित असणाऱ्या समस्यांचे संशोधन.

२) वर्तमानकाळाशी संबंधित असणाऱ्या समस्यांचे संशोधन.

३) भविष्यकाळाशी संबंधित असणाऱ्या समस्यांचे संशोधन.

शैक्षणिक संशोधनाचे तीन प्रकार आहेत.

१) ऐतिहासिक संशोधन पद्धती.

२) प्रायोगिक संशोधन पद्धती.

३) वर्णनात्मक संशोधन पद्धती.

वर्तमानकाळाशी संबंधित असलेले संशोधन ज्या पद्धतीने पूर्ण केले जाते त्यास वर्णनात्मक संशोधन पद्धती असे म्हणतात. वर्तमानकाळाशी संबंधित असणारे पुढील सर्व प्रकार वर्णनात्मक संशोधनाच्या विभागामध्ये घेतलेले आहेत.

अ) सर्वेक्षण पद्धती    ब) व्यक्ती अभ्यास    क) तौलनिक कार्यकारण पद्धती.

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने सर्वेक्षण ही पद्धती म्हणून स्विकारली आहे. संशोधनासाठी प्राथमिक शाळांच्या मुख्याध्यापकांचा विचार केला आहे. शासकीय प्रशासनातील गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख यांचा संशोधनात विचार केलेला आहे.

या संशोधन काळात पुढील अभ्यास घटकांचा समावेश करण्यात आला आहे.

१. प्राथमिक शाळांतील प्रशासनाचे सर्वेक्षण.

२. प्राथमिक शिक्षणाच्या शासकीय प्रशासनाचे सर्वेक्षण.

३. प्राथमिक शाळांच्या प्रशासनात येणाऱ्या समस्यांचा अभ्यास.

४. प्राथमिक शिक्षणाच्या शासकीय प्रशासनातील येणाऱ्या समस्यांचा अभ्यास.

५. प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनात येणाऱ्या समस्यांवर उपाय सूचविणे.

हा सर्व अभ्यास सद्य:स्थिती निर्देशक असल्याने प्रस्तुत संशोधनामध्ये सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग केलेला आहे. सर्वेक्षण पद्धतीचे विषय, अभ्यासाची उद्दिष्टये, अभ्यास क्षेत्रे, साधन तंत्रे इत्यादी नुसार विविध प्रकार पडतात. संशोधनात कोणता अभ्यास अभिप्रेत आहे हे वर घेतलेल्या आढाव्यावरून स्पष्ट होते. म्हणून प्रस्तुत संशोधन हे "सर्वेक्षण" या प्रकारात मोडते.

प्रस्तुत संशोधनात प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास असल्याने संशोधकाने प्राथमिक शाळांचे मुख्याध्यापक व शासकीय अधिकारी यांची निवड केली. त्यासाठी प्रश्नावली व मुलाखतीसाठी मुलाखत सूची तयार केली. या प्रश्नावलीच्या व मुलाखत प्रश्नसूचीच्या आधारे संशोधकाने संशोधन कार्य व प्रस्तुत अहवाल तयार केला. वरीलप्रमाणे संशोधन पद्धती संशोधन अभ्यासासाठी निश्चित झाल्यावर संशोधकाने संशोधनाची कार्यपद्धती ठरविली.

## ४.0४ नमुना निवड.

प्रस्तुत संशोधनामध्ये नमुन्याची निवड करताना माळशिरस तालुक्यातील प्राथमिक शाळांची निवड खालील प्रमाणे करण्यात आली.

१. माळशिरस तालुक्यातील सर्वच्या सर्व अनुदान प्राप्त प्राथमिक शाळांची निवड केली.

२. माळशिरस तालुक्यातील जिल्हा परिषद, शेती महामंडळ व खाजगी संस्था यांनी चालविलेल्या सर्व शाळांची निवड करण्यात आली.

३. या सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांची प्रतिसादकासाठी निवड केली.

४. गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख यांची प्रतिसादकासाठी शासकीय अधिकारी म्हणून निवड केली.

मुख्याध्यापकांसमोर निर्माण होणा-या प्रमुख समस्यांचा अभ्यास करण्याचा हेतू असल्याने मुख्याध्यापकांसाठी प्रश्नावली तयार केली. ती परिशिष्ट "अ" मध्ये देण्यात आली आहे. गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख यांच्या मुलाखतीसाठी प्रश्नसूची तयार करण्यात आली. गटशिक्षणाधिका-यांची मुलाखत परिशिष्ट "ई" मध्ये देण्यात आली आहे. मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी यांची वर्गवारी खालील प्रमाणे आहे.

कोष्टक क्रमांक ४.०१

नमुना निवड - प्रतिसादके.

| अनुक्रमांक | प्रतिसादक स्वरूप | प्रतिसादक संख्या. |
|---|---|---|
| ०१ | मुख्याध्यापक | ६६ |
| ०२ | केंद्रप्रमुख | १४ |
| ०३ | शिक्षण विस्तार अधिकारी | ०६ |
| ०४ | गटशिक्षणाधिकारी | ०१ |

## ४.०५ संशोधनाची साधने.

संशोधनासाठी संशोधकाने जो विषय निवडला आहे त्या संबंधात विविध प्रकारची माहिती गोळा करावी लागते. ती माहिती जमा करण्याची ही विविध साधने आहेत. या अनेक साधनांमधून संशोधकाने योग्य त्या साधनांची निवड करणे गरजेचे असते. ही निवड करण्यापूर्वी संशोधकाला त्या साधनांच्या गुणदोष व मर्यादांची माहिती असणे गरजेचे असते. ती साधने केंव्हा व कोठे वापरावीत याचीही माहिती संशोधकाला असणे आवश्यक असते. या साधनांपैकी एक अथवा अनेक साधनांचा वापर संशोधक करू शकतो. संशोधकाने साधनांच्या आधारे जमा केलेली माहिती गुणात्मक व संख्यात्मक स्वरूपाची असू शकते. संशोधन साधनांमध्ये निरीक्षण, मुलाखती, प्रश्नावली, प्रमाणित चाचण्या, पडताळा सूची, मतावली, गटचर्चा अशी विविध साधने असतात. सदर संशोधन सर्वेक्षणावर आधारित असल्यामुळे प्रश्नावलीचा वापर करणे योग्य ठरते.

माहिती संकलीत करण्यासाठी संशोधकाने शाळेच्या मुख्याध्यापकांकडे प्रश्नावली पाठविली. प्रश्नावलीत खालील मुद्यांचा समावेश करण्यात आला व त्या मुद्यांवर प्रश्न निश्चित केले.

## ४.0६ मुख्याध्यापकांसाठी प्रश्नावली.

या प्रश्नावलीत मुख्याध्यापकांना कोणत्या उद्दिष्टानुसार प्रश्न विचारले आहेत ते स्पष्ट केले आहे. प्रश्नावलीतील विभाग, उद्दिष्टे व प्रश्नप्रकार खालील प्रमाणे आहेत.

| अ.नं. | विभाग. | उद्दिष्टे. |
|---|---|---|
| 0१ | मुख्याध्यापकांची वैयक्तिक माहिती. | मुख्याध्यापकांची वैयक्तिक माहिती घेणे. |
| 0२ | प्राथमिक शाळेविषयी माहिती. | प्राथमिक शाळेविषयी सर्वसाधारण माहिती मिळविणे. |
| 0३ | कार्यालयीन कामकाज व दप्तर. | प्राथमिक शाळेच्या कार्यालयीन कामकाज व शालेय दप्तरासंबंधी माहिती मिळविणे. |
| 0४ | शिक्षकांविषयी माहिती. | प्राथमिक शाळेच्या शिक्षकांची विद्यर्थीविषयक माहिती मिळविणे. |
| 0५ | विद्यार्थ्यांविषयी माहिती. | विद्यार्थ्यांविषयी माहिती मिळविणे. |
| 0६ | भौतिक सुविधा व शालेय परिसर. | प्राथमिक शाळेतील शालेय परिसर व भौतिक सुविधा यांची माहिती घेणे व येणा-या अडचणींची नोंद करणे. |
| 0७ | इतर. | प्रश्नावलीत इतर मुद्याखेरीज या संशोधनाच्या दृष्टीने माहिती मिळविणे. |

प्राथमिक शाळांच्या प्रशासना संदर्भात माहिती हवी होती म्हणून संशोधकाने त्यांना प्रश्नावली तयार केली. प्रश्नावलीत एकूण ६ विभाग होते. त्यात एकूण ७0 प्रश्न विचारले. त्यातील ४५ प्रश्न बद्ध स्वरूपाचे व २५ प्रश्न मुक्त स्वरूपाचे होते. बद्ध प्रश्नातून प्रशासनाची माहिती मिळविली. परंतू प्रशासनासंबंधी समस्यांची माहिती मिळविण्यासाठी मुक्त प्रश्नांचा उपयोग केला.

प्रत्येक विभागात विभागात विचारलेले प्रश्न खालील प्रमाणे आहेत.

विभाग १. मुख्याध्यापकांची वैयक्तिक माहिती :

यात चार प्रश्न विचारले ते चारही प्रश्न बद्ध स्वरूपाचे होते.

विभाग २. शाळाविषयी माहिती.

यात दहा प्रश्न विचारले. ते सर्व बद्ध स्वरूपाचे होते.

विभाग ३. कार्यालयीन कामकाज व शालेय दप्तर.

यात विस प्रश्न विचारले. नऊ बद्ध स्वरूपाचे व अकरा मुक्त स्वरूपाचे होते.

विभाग ४. शिक्षकांविषयी.

यात विस प्रश्न विचारले. बारा बद्ध व आठ मुक्त स्वरूपाचे होते.

विभाग ५. विद्यार्थ्यांविषयी.

यात दहा प्रश्न विचारले. त्यात पाच बद्ध व पाच मुक्त स्वरूपाचे होते.

विभाग ६. भौतिक सुविधा व शालेय परिसर.

यात पाच प्रश्न विचारले. ते सर्व बद्ध स्वरूपाचे होते.

विभाग ७. इतर माहिती.

यात एक प्रश्न विचारला होता. तो मुक्त स्वरूपाचा होता.

## ४.०७ केंद्रप्रमुखांच्या मुलाखतीसाठी प्रश्नसूची.

प्राथमिक शाळांच्या प्रशासनासंदर्भात शाळा समूहावर नेमलेले केंद्रप्रमुख यांना मुलाखतीसाठी प्रश्नसूची तयार करण्याता आली. या प्रश्नसूचीमध्ये प्राथमिक शाळांच्या शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजाविषयी १६ प्रश्न विचारण्यात आले. केंद्रप्रमुखांची वैयक्तिक माहिती घेण्यात आली. त्यात त्यांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, केंद्रप्रमुख पदाचा अनुभव, अध्यापनाचा अनुभव या विषयासंबंधी माहिती घेण्यात आली.

शाळांतील पटनोंदणी वाढीसाठी केले जाणारे प्रयत्न, गळती रोखण्यासाठीचे प्रयत्न, गुणवत्ता वाढीसाठीचे प्रयत्न व आजच्या शिक्षणात समाजाचा सहभाग, शिक्षकाचे पाठटाचण, शाळा तपासणी, ग्रामशिक्षण समिती कामकाज याबाबत प्रश्नसूची तयार करण्यात आली.

त्यानंतर संशोधकाने केंद्रप्रमुखांच्या प्रत्यक्ष भेटी घेवून मुलाखती घेतल्या.

**४.०८ शिक्षण विस्तार अधिका-यांसाठी प्रश्नसूची.**

प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात शिक्षण विस्तार अधिका-यांच्या मुलाखतीसाठी प्रश्नसूची तयार करण्यात आली. या प्रश्नसूचीत प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनासंदर्भात २० प्रश्न विचारण्यात आले. विस्तार अधिका-यांची वैयक्तिक माहिती घेण्यात आली. त्यात शैक्षणिक लायकी, प्रशासकीय अनुभव, अध्यापनाचा अनुभव यासंबंधी माहिती घेण्यात आली.

शासकीय कामाची पूर्तता, शिक्षकांची पदोन्नती, वेतनवाढ, शाळा दुरूस्ती, शाळा तपासणी, शिक्षकांशी संबंध, शासनाची येणारी परिपत्रके, शासनाच्या विविध योजना, त्याची अंमलबजावणी, गोपनीय अहवाल लेखन, शाळा अभिलेख तपासणी, स्पर्धा परिक्षा या संदर्भात प्रश्नसूची तयार करण्यात आली. त्यानंतर संशोधकाने प्रत्यक्ष भेटी घेवून त्यांच्या मुलाखती घेतल्या.

**४.०९ गटशिक्षणाधिका-यांच्या मुलाखतीसाठी प्रश्नसूची.**

माळशिरस तालुक्याचा प्रशासन प्रमुख गटशिक्षणाधिका-यांसाठी प्रश्नसूची तयार करण्यात आली. या प्रश्नसूचीमध्ये प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनासंदर्भात १२ प्रश्न विचारण्यात आले. त्यांचे नाव, अनुभव, वय, व्यवसायातील पात्रता इ.बाबतीत प्रश्न विचारून वैयक्तिक माहिती घेण्यात आली.

**४.१० प्राथमिक शाळांना भेटी व निरीक्षणे.**

माळशिरस तालुक्यातील २५ शाळांना संशोधकाने भेटी दिल्या. या भेटीतून संशोधकाला प्राथमिक शाळांच्या संदर्भात माहिती मिळाली. वेळोवेळी संशोधकाने प्राथमिक शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक यांच्या भेटी घेतल्या व त्यांच्याशी चर्चा केली. त्यांच्या भेटीतून संशोधनासंबंधी उपयुक्त माहिती मिळाली.

ज्ञान मिळविण्याचे नैसर्गिक साधन म्हणजे निरीक्षण होय. प्रत्यक्ष निरीक्षण केल्याने मिळालेल्या माहितीची पडताळणी करता येते. हे संशोधन सर्वेक्षण पद्धतीने असल्याने महत्वाची माहिती गोळा करण्यासाठी निरीक्षण हे साधन संशोधकाला फारच उपयोगी ठरले. संशोधकाला प्रत्यक्ष निरीक्षणातून निश्चित माहिती मिळविता आली. संशोधकाने माळशिरस तालुक्यातील २५

शाळांना भेटी देऊन निरीक्षण केले. प्राथमिक शाळांमधील भौतिक सुविधांची पाहणी केली. या माहितीमध्ये वर्गखोल्या, फर्निचर, कार्यालय, शैक्षणिक साधने, ग्रंथालय, इतर सुविधा, परिसराचा वापर, प्रयोगशाळा याबाबत निरीक्षणाने माहिती मिळविली.

संशोधकाने माळशिरस तालुक्यातील २५ शाळांना भेटी दिल्या असता असे दिसून आले की १२ शाळांना इमारती चांगल्या दर्जाच्या आहेत. ८ शाळांना इमारती निकृष्ट दर्जाच्या आहेत व ३ शाळा देवळात भरत आहेत तर २ शाळांना अपु-या खोल्यामुळे भाडोत्री खोल्या घ्याव्या लागल्या. कांही वर्गखोल्या लहान असून वर्गात भरपूर सूर्यप्रकाश येत नाही. विद्यार्थ्यांसाठी एकाही शाळेत फर्निचर सोयी आढळल्या नाहीत. मुख्याध्यापकांना कार्यालय खोली नाही. शैक्षणिक साधनांचा वापर फक्त ५२% शाळा करतात. १४ शाळांना क्रिडांगण नसल्याचे दिसून आले.

## ४.११ संशोधनाची कार्यपद्धती.

संशोधकाने संशोधनाच्या अभ्यासासाठी खालील प्रमाणे कार्य केले.

१. प्रथम संशोधकाने प्राथमिक शाळांशी संबंधित संदर्भ साहित्य व शासकीय परिपत्रकांचा अभ्यास केला.

२. संदर्भ साहित्याचा अभ्यास केल्यानंतर प्रस्तुत संशोधनाचा आराखडा तयार केला.

३. प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास करण्यासाठी जि.प.शाळा, पिरळे यांच्या मुख्याध्यापकांकडून माहिती घेतली.

४. माळशिरस तालुक्यातील अनुदानित प्राथमिक शाळांची संशोधन अभ्यासासाठी निवड करण्यात आली.

५. प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापकांसाठी प्रश्नावली तयार करण्यात आली. केंद्रप्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांच्या मुलाखतीसाठी प्रश्नसूची तयार करण्यात आली. शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी, जि.सोलापूर तर्फे आयोजित केलेल्या "संशोधन चर्चा" सेमीनार मध्ये तयार केलेल्या प्रश्नावली व प्रश्नसूची यांच्यासंबंधी चर्चा केली. ती प्रश्नावली मार्गदर्शकांकडून तपासून घेतली. त्यानंतर प्रश्नावली व प्रश्नसूची शिक्षणशास्त्र

महाविद्यालय, बार्शी येथील प्राध्यापक डॉ.इंगोले, प्रा.डॉ.पवार यांच्याकडून तपासून घेतली.

६. संशोधनाची अपेक्षित उद्दिष्टे साध्य होतील या दृष्टीने संपूर्ण माहिती उपलब्ध होईल अशा प्रकारचे प्रश्न प्रश्नावलीत व प्रश्नसूचित समाविष्ट करण्यात आले.

७. जि.प.शाळा, पिरळे, ता.माळशिरस या शाळेच्या मुख्याध्यापकांकडून प्रश्नावली भरून घेतली. प्राथमिक शाळांशी संबंधित अहवाल व परिपत्रके या माहितीच्या आधारे मुख्याध्यापकांशी प्रत्यक्ष चर्चा करून प्रश्नावली भरून घेण्यात आली. प्राथमिक शिक्षणाशी संबंधित केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांच्या मुलाखतीसाठी प्रश्नसूची तयार करण्यात आली. वरील सर्व शासकीय अधिकाऱ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या.

८. मुख्याध्यापकांना प्रश्नावली पाठविणे व त्यांच्याकडून भरून झालेली प्रश्नावली परत मिळवणे या सर्व गोष्टी प्रत्यक्ष तालुका मिटींगच्या वेळेस केल्या. या संदर्भात नियोजनबद्ध कार्यवाही केली. त्याचप्रमाणे कांही प्रश्नावल्या स्वत: जाऊन व मित्रांच्या मदतीने भरून घेण्यात आल्या.

९. संशोधकाने संशोधन सुरू असताना २५ प्राथमिक शाळांना भेटी दिल्या. प्राथमिक शाळांतील भौतिक घटकांचे निरीक्षण केले व त्याच्या नोंदी केल्या.

१०. प्रश्नावलीद्वारे मिळविलेली माहिती एकत्रित करण्यात आली. प्रत्येक विभागातील प्रत्येक प्रश्नाविषयी मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांच्या प्रतिसादाचे संकलन करण्यात आले. माहिती विश्लेषणासाठी व स्पष्टीकरणासाठी संख्याशास्त्रीय “शतमान” या पद्धतीचा अवलंब करण्यात आला.

११. मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांच्या प्रश्न सूचीचे प्रतिसादाची संख्या व शेकडा प्रमाण काढले. संख्याशास्त्रीय माहितीचे विश्लेषण करण्यात आले. माहिती कोष्टकाच्या स्वरूपात संकलित करण्यात आली.

## ४.१२ समारोप.

मुख्याध्यापकांच्या प्रश्नावलीतून मिळालेली माहिती, इतर शासकीय घटकांच्या मुलाखतीतून मिळालेली माहिती, प्राथमिक शाळांचे केलेले निरीक्षण व भेटी या सर्वातून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण व विशदीकरण करण्यात आले ते पुढील प्रकरणात देण्यात आले आहे.